**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

**Vol - IV Issue-I JANUARY 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025**

# लिंगायत समाज संघटना समोरील आव्हान

**डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव**
विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक,
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या मांडणीचा हेतू महाराष्ट्रासह संबंध देशभरातील लिंगायत समाज संघटनांचा आढावा घेवून त्या समोरील आव्हानांना स्पष्ट करण्याचा आहे. लिंगायत समाज संघटना लिंगायत समाज बांधवाच्या हित संबंधाची जोपासना करण्यात अपयशी का ठरतात ? त्याची कारणमीमांसा करणे हा आहे. लिंगायत समाज हा विविध मठ, धर्मगुरु प्रणीत विचारधारेत गुरफटलेला आहे. परिणामत: त्याचे प्रभावी संगठण उभा राहू शकले नाही. या गृहीतकास प्रमाण माणुन चिंतन करण्यात आले.

भारतीय व्यक्ती व समाज जीवनात धर्म ही अतिशय महत्वाची बाब आहे. यास समजुनच चार्वाक पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत अनेकांनी भारतीय धर्मग्रंथ व संस्कारांची चिकित्सा केली. परिणामत: चार्वाक मत बौध्द धर्म, जैन धर्म, मुस्लीम धर्म, पारशी धर्म, इत्यादींचा उदय झाला. असाच एक धर्मप्रवाह दक्षिण भारतात महात्मा बसवण्णा व शरणांच्या नेतृत्वाखाली १२ व्या शतकात उदयास आला. ज्यास संपुर्ण जगात लिंगायत किंवा वीरशैव या नावाने ओळखले जाते. अलिकडे लिंगायत हा प्रमाण शब्द आहे. यास अनेक अभ्यासक, धर्मगुरु व इतिहासतज्ञ मान्यता देत आहेत.

संपूर्ण भारतात ७ ते ८ कोटी लिंगायत समाज आहे. त्यापैकी महाराष्ट्रात लिंगायतांची १ कोटीच्या आसपास लोकसंख्या आहे. तरीही महाराष्ट्र शासन, प्रशासन व प्रसारमाध्यमे लिंगायत समाजाच्या प्रश्न व स्थितीकडे लक्ष देत नाहीत. त्याचे कारण या समाजाच्या असंघटीतपणात आहे. महाराष्ट्रात सत्तेच्या बेरजेच्या राजकारणात हा समाज अपयशी ठरतो. महाराष्ट्रातील एक धर्मनिरपेक्ष लोकशाहीवादी व कष्टाळु समाज अशी ओळख या समाजाची आहे. पहिल्या टप्यातील एक जमीनदारी वर्ग आणि ग्रामीण अर्थ व राजकारणावर प्रभुत्व ठेवणारा समाज अशी या समाजाची ओळख होती. परंतू वाढती लोकसंख्या, संपत्तीचे होणारे विभाजन, वाढती व्यसनाधिनता व शिक्षणाकडील दूर्लक्षामुळे या समाजात बेकारी व मजूरी करुन जीवन जगण्याचे प्रमाण वाढत आहे. असे असतानाही या समाजातील धर्मगुरु व संघटना या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शासन दरबारी आवाज प्रभावीपणे मांडत नाहीत. या समाजातील अभिजन वर्ग आपला सत्तेतील वाटा सुरक्षित कसा राहील अशी भुमिका घेवून समाजकारण व राजकारण करत आहे.

महाराष्ट्रात लिंगायत समाजाच्या अनेक संघटना आहेत. आखिल भारतीय वीरशैव महासभा, महाराष्ट्र वीरशैव सभा, आखिल भारतीय लिंगायत गवळी समाज संघटना, आखिल भारतीय वीरशैव युवक संघटना (शिवा), बसव ब्रिगेड, लिंगायत सेवा संघ, बसव सेवा संघ, लिंगायत आरक्षण संघर्ष समिती, महाराष्ट्र लिंगायत आरक्षण एकीकरण समिती, आखिल भारतीय लिंगायत समन्वय समिती, लिंगायत महासभा, बसव समिती, बसव सेना, वचन ॲकॅडमी, महाराष्ट्र बसव परिषद, अशा विविध राष्ट्र व राज्य पातळीवर काम करणाऱ्या संघटना आहेत. या सर्व संघटना समाजाच्या प्रश्नांना घेवून काम करतात. तसेच एक वैचारिक परिपक्वता असलेला समाज बांधव निर्माण करण्याच्या दिशेनेही काम करत आहेत. तसेच या संघटनांमधले मतभेद अगदी उघड आहेत. परंतू अलिकडेच यातील बऱ्याच संघटना स्वतंत्र धर्म मान्यता व पुतळा उभारणीसाठी एकत्र येताना दिसून येत आहेत. तसेच लातूर, उदगीर, पुणे, निलंगा, नांदेड अशा विविध भागात लिंगायत धर्माची विचारसरणी समजून घेण्यासाठी अनुभव मंटपाची स्थापना होत आहे. यामुळे नवतरुणांना लिंगायत समाजाची वैचारिक पार्श्वभुमी शरण साहित्य व वचन साहित्याची चांगली जाण येत आहे.

लिंगायत समाज बांधवांच्या धर्म मान्यता, आरक्षण, स्मशानभुमी, महात्मा बसवेश्वर आर्थिक महामंडळ असे विविध प्रश्न सध्या आहेत. यासर्व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी वरील सर्व संघटना त्यांच्या-त्याच्या पातळीवर प्रयत्न करत आहेत. लिंगायत हा एक स्वतंत्र धर्म आहे. कारण हा धर्म स्वतंत्र धर्म मान्यतेचे शासकीय व सामाजिक पातळीवरचे सर्व निकष पुर्ण करतो. धर्मसंस्थापक, ईश्वर संकल्पना, धर्मग्रंथ, धर्मभाषा, श्रध्दाव्यवस्था, श्रध्दास्थाने, सण-उत्सव, नीतिशास्त्र, जन्म-विवाह-मृत्यूविषयक संस्कार व्यवस्था, विश्व संकल्पना, स्वर्ग-नरक संकल्पना, वंशसंकल्पना, संस्कृती, समाजव्यवस्था, जीवनविषयक दृष्टिकोन, जीवनपध्दती इत्यादी हे स्वतंत्र धर्मसंकल्पनेचे प्रमुख निकष आहेत. भारतीय राज्यघटनेच्या २५ ते ३० कलमनुसार धर्मसंस्थापक, धर्मग्रंथ, धर्मश्रध्दा

व वर्तनसंहिता आणि तत्वज्ञान या बाबी आवश्यक मानलेल्या आहेत. लिंगायतांच्या स्वतंत्र धर्म मान्यतेच्या मागणीला भारतीय राज्यघटनेचा भक्कम आधार लाभलेला आहे हे लक्षात येईल.

लिंगायत धर्माला भारतीय राज्यघटना व भारत सरकार (गृहमंत्रालय) यांच्याकडून स्वतंत्र धर्म ही मान्यता मिळविणे ही सध्याची सर्वात महत्वाची गोष्ट आहे. या मान्यतेशिवाय शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे, प्रसार माध्यमे लिंगायत धर्माच्या समस्या व प्रश्नाची दखल घेणार नाहीत. तथापि प्रथमतः स्वतंत्र धर्म ही मान्यता मिळावी लागते. कोणत्याही समाजाला स्वतंत्र धर्माची मान्यता भारत शासनाच्या गृहमंत्रालयाकडून दिली जाते. स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळाली की, स्वतंत्र जनगणना केली जाते आणि त्या धर्माच्या अनुयायांना अल्पसंख्याक समाज हा रीतसर दर्जा मिळतो. ज्यामुळे आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक, राजकीय व सामाजिक अशा सर्व प्रकारच्या सवलती व संधी लिंगायत समाजबांधवांना मिळू शकतात. ज्या घटनात्मक आणि शासनमान्य असतात. अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या अंदाजपत्रकात व योजनांमध्ये हजारो कोटी रुपयांची तरतूद केली जाते. या आर्थिक हितास लिंगायत समाजबांधवांनी समजावून घेतले पाहिजे.

केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाकडे स्वतंत्र धर्म आणि अल्पसंख्यांक समाज या मागण्यासंबंधी पाठपुरावा करताना लिंगायत हा एकच शब्दप्रयोग करणे अनिवार्य बनले आहे कारण, वीरशैव शब्द शासन व कोर्ट दोघांनी नाकारला. लिंगायत या शब्दांत अर्थगर्भितता व स्पष्टता आहे. भारतातील इतर धर्मियांसाठी H - हिंदू, I - इस्लाम, C - ख्रिश्चन, S - शीख, P - पारशी, B - बौध्द आणि J - जैन या सर्वांसाठी भारत सरकारने एकच आद्याक्षर मान्य केले आहे. एका धर्मासाठी दोन आद्याक्षरे किंवा जोडक्षरे शासनाने नाकारले आहे. इतर सर्व धर्मीयांसाठी एक आद्याक्षर आणि लिंगायतांसाठी मात्र दोन आद्याक्षरे ही मागणी अयोग्य आहे. लिंगायत धर्मासाठी - L हे आद्याक्षर मान्य झाल्यानंतर ते इतर धर्मांच्या एक आद्याक्षरांशी सुसंगत वाटते.

कर्नाटक व महाराष्ट्र शासनाच्या सर्व गॅझेटीअर्समध्ये पूर्वीपासूनच लिंगायत हा शब्द सातत्याने नोंदवला आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमध्येसुध्दा जातिधर्माचा उल्लेख करताना लिंगायत असाच शब्दप्रयोग केल्याचे अनेक दाखले सापडतात. लिंगायत हा शब्द सर्व राज्यांतील आणि सर्व स्तरांतील लोकांना अधिक प्रमाणात परिचित व जवळचा वाटतो. कर्नाटकात बहुतांशी लोक लिंगायत या शब्दाचा वापर करतात. कर्नाटक उच्च न्यायालयाने लिंगायत हाच शब्द वापरावा असा निकाल दिला आहे. ब्रिटीश कालखंडातील तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील अनेक जनगणनात लिंगायत हाच शब्द वापरला आहे. तसेच भारत व भारताबाहेरील अनेक समाजशास्त्रज्ञ, इतिहासतज्ञ, अभ्यासक, संशोधक, साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते आणि प्रसारमाध्यमे यांनी आपल्या लेखन व विचार आणि संदर्भात लिंगायत या शब्दाचा पुरेपुर वापर केला आहे. यामध्ये रेजिनॉल्ड इंथोवेन, सी.पी.ब्राऊन, सर हर्बर्ट रिझले, सर जॉन मार्शल, डेव्हिड मंडेलबाम, इ. डब्ल्यु हॉफकिन्स, बेंझामिन वॉकर, आय.एन.सॅलेटोर, आर.सी.झीनर, डॉ.बी.एस.बालिगा, डॉ.ओ.पी.सिंह, जगद्विख्यात समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर, डॉ.एच.एम.श्रीनिवास, डॉ.के.ईश्वरन्, डॉ.एस.एम.हुनशाळ, डॉ.जी.एस.खैर, प्रा.एम.आर.साखरे, डॉ.एच.एम.सदाशिवय्या, डॉ.एस.सी.नंदीमठ, पी.एम.गिरीराजू, सी.एस.होसमनी, कुमारस्वामीजी, लिंगानंद स्वामीजी, डॉ.जयदेवीताई लिगाडे, शशिकलाताई मडकी, माते महादेवी, डॉ.बसवलिंग पट्टदेवरु, माजी उपराष्ट्रपती डॉ.बी.जी.जत्ती, अरविंद जत्ती, प्रा.भिमराव पाटील, डॉ.अशोक मेनकुदळे, राजु झुबरे, बाळासाहेब पाटील, इंजि.शशीकांत उरगुंडे, विजय शेटे, यासह अनेक अभ्यासकांचा उल्लेख करता येईल.

लिंगायत हा एक शांतताप्रिय व धर्मनिरपेक्ष समाज आहे. ब्रिटीश काळात १८७१ ते १९३१ पर्यंत झालेल्या जनगणनेत लिंगायत हाच शब्दप्रयोग करण्यात आला. परंतू स्वातंत्र्यानंतर झालेल्या जनगणनेत लिंगायत धर्मियांची स्वतंत्र जनगणना झालीच नाही. तेव्हा त्याबाबत लिंगायत नेतृत्व, मठाधीश व समाज बांधवांनी कसल्याही प्रकारचा आवाज उठवला नाही त्याचे परिणाम संबंध भारतातील लिंगायत धर्मियांना भोगावे लागत आहेत. लिंगायत म्हणून स्वतंत्र जनगणना न होण्याला तत्काळातील हिंदूत्ववादी विचारसरणी व संघटना आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचा धूर्तपणा असावा. स्वतःच्या धर्माप्रमाणे जगण्याचा प्रत्येक नागरिकाला भारतीय राज्यघटनेने मूलभुत अधिकार दिलेला आहे. स्वातंत्र्यानंतर जैन धर्मियांनी स्वतंत्र धर्माची मागणी सातत्याने शासनासमोर मांडुन त्यास मान्यता मिळवून घेतली आपणासही त्याच दिशेने पाऊल टाकणे गरजेचे आहे. त्यासाठी लिंगायत समाजाच्या सर्व संघटना, मठाधीश व धर्मगुरु यांनी लिंगायत समाजाला जागरुक करावे लागेल. तसेच लिंगायतांचा स्वाभिमानाचा इतिहास व त्याची ओळख करुन द्यावी लागेल. अनुभव मंटपाच्या माध्यमातुन शरणांचे साहित्य आणि लिंगायत तत्वज्ञान गावोगाव पोहोचवावे लागेल. त्यासाठी महात्मा बसवण्णांना अपेक्षित असलेला शरण उभा करावा लागेल. एक आदर्श नागरिक आदर्श शरणांच्या रुपात उभा टाकला तरच समाजाचे प्रश्न सर्व स्तरापर्यंत पोहोचतील व सर्व समाजाचे संघटन धर्ममान्यतेसह इतर प्रश्नासाठी संघटीत होईल. मात्र हे करत असताना समाजाच्या अभिजनांनी आपला दासोहचा वाटा द्यावा लागेल. मठाधीशांनी आपआपसातील मतभेद बाजुला ठेवून

Vol - IV Issue-I JANUARY 2017 ISSN 2349-638x Impact Factor 3.025

समाजाला संघटीत होण्याच्या दिशेने मार्गदर्शन करावे लागेल. मी समाजाचा एक महत्वाचा घटक आहे. माझ्या सर्वांगिण योगदानामुळे समाजाचे प्रश्न सुटण्यास मदत होते अशी भावना लिंगायत समाजा बांधवांमध्ये येणे गरजेचे आहे. असे झाले तरच समाजाचे प्रश्न सुटतील अन्यथा आपण आपआपसात भांडुन घेत राहू परिणामतः कोणतेही सामाजिक व राजकीय गणित साध्य होणार नाही. ते साध्य करायचे असेल तर सर्वांनी एकमुखाने महात्मा बसवण्णांचे तत्वज्ञान प्रमाण मानुन ते स्वीकारावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :**

१) बसवेश्वरा ॲंड हिज टाईम्स, डॉ.पी.बी.देसाई.
२) आद्यसमाजसुधारक महात्मा बसवेश्वर, डॉ.अशोक मेनकुदळे.
३) वीरशैव व इतर धर्म आणि समाज, डॉ.सुर्यकांत घुबरे.
४) लिंगायत धर्म समाज व संस्कृती, डॉ.हिरमल्लु ईश्वरण.
५) परिवर्तनाचा महामेरु, महात्मा बसवेश्वर, डॉ.सच्चिदानंद बिचेवार.